# अभिरुचीनुसार व्यक्तिमत्वाला आकार देण्याचा प्रयत्न करावा : डॉ. बुधवंत

कोल्हापूर, दि. ४ (प्रतिनिधी) - गतिमान जगात अभिरुचीनुसार व्यक्तिमत्वाला आकार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन शहर पोलिस उपअधीक्षक डॉ. बुधवंत यांनी केले.

येथील कमला महाविद्यालयात स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकास विभागातर्फे डॉ. बुधवंत यांचे स्पर्धात्मक परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

बुधवंत म्हणाले, आजचे जग गतिमान आहे. सर्वत्र स्पर्धा आहे. त्यामुळे आपण स्वतःच्या अभिरुची आधी ओळखल्या पाहिजेत. त्यानुसार आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे आपल्याला यश प्राप्त करता येते. सभोवतालच्या जगाचा अनुभव घेण्यासाठी आपण आपले डोळे, कान व मन जागे ठेवले पाहिजे. जे जे चांगले अनुभव मिळतील त्या अनुभवांचा संग्रह आपल्या व्यक्तिमत्वात कक्षा रुंदावल्या पाहिजेत. तसेच खेळ नाट्याभिनय, एन. सी. सी सारख्या योजनांचा आपल्या व्यक्तिमत्व जडणघडणीत महत्वपूर्ण वाटा असतो. म्हणून विद्यार्थिनींनी स्वतःला कमी न लेखता कठोर परिश्रम घेऊन आपले व्यक्तिमत्व फुलविले पाहिजे. वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांमध्ये नेत्रदीपक यश प्राप्त करावे.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, जिद्द, आत्मविश्वास, परिश्रम घेण्याची तयारी ठेवल्यास आपल्याला यश निश्चित मिळते. म्हणून विद्यार्थ्यांनी प्रयत्नवादी राहिले पाहिजे. यशाची शिखरे काबीज करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रास्ताविक प्रा. वर्षा मैंदर्गी यांनी केले प्रा. टी. पी. पाटील यांनी आभार मानले.

10/10/99

# रूपाली कांबळेची निवड

कोल्हापूर, दि. १ (प्रतिनिधी) - रत्नागिरी येथे झालेल्या शासकीय उच्च माध्यमिक विभागीय कॅरम स्पर्धेमध्ये कमला कॉलेजची रूपाली कांबळे हिने गुणानुक्रमे प्रथम क्रमांक मिळविला असून तिची राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थिनीला प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. प्रा. सुनीता काळे व प्रा. साधना पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

२८/१/९९ पुढारी

# कमला कॉलेजचे दुहेरी यश

कसबा बावडा, दि. २८ (वार्ताहर) : शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय महिला बास्केटबॉल स्पर्धेमध्ये व जिल्हास्तरीय शासकीय बास्केटबॉल स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींमध्ये कमला कॉलेजचा संघ अजिंक्य ठरला.

आज महावीर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झालेल्या सीनियर महिला विभागात उपांत्य सामन्यामध्ये कमला कॉलेजने ए. एस. सी. कॉलेज (इचलकरंजी) यांचा पराभव करून तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात वारणा महाविद्यालयाने कन्या महाविद्यालय (इचलकरंजी) यांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला.

अंतिम सामन्यात कमला कॉलेजने वारणा महाविद्यालयास १८ वि. १२ गुणांनी हरवून अजिंक्यपद पटकावले. १९ वर्षांखालील मुलींमध्येही कमला कॉलेजने डी. डी. शिंदे कॉलेजचा ९ वि. २ गुणांनी पराभव करून अजिंक्यपद पटकाविले.

१९ वर्षांखालील मुलांच्या अंतिम फेरीत प्रवेश करताना महावीर महाविद्यालयाने विवेकानंद महाविद्यालयाचा ३२ वि. ४ गुणांनी पराभव केला तर नाईट